**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांचे लागवडीमधील अंतर व कलमे/रोपांचे लागवडीचे सुधारित मापदंडाबाबत...**

महाराष्ट्र शासन,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्रमांक - फळबाग -२०१५/प्र.क्र.७५/रोहयो-५.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक : ३ सप्टेंबर, २०१६

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्र. मग्रारो-११/प्र.क्र.५८/रोहयो १० अ, दिनांक २९ जून, २०११
२) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०११/प्र.क्र.१३२/रोहयो १०अ, दिनांक २० जानेवारी, २०१२
३) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.११८/मग्रारो-१, दिनांक २० फेब्रुवारी, २०१४
४) शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१३/प्र.क्र.११८/ मग्रारो-१, दिनांक १९ जून, २०१४
५) संचालक फलोत्पादन यांचे पत्र क्र. जा.क्र. संफ/फलो-२मग्रारोहयो मापदंड/८९९/२०१६, दिनांक २१/०३/२०१६
६) संचालक फलोत्पादन यांचे अध्यक्षतेखाली संचालक कृषी विद्यापिठ यांचे समावेत झालेल्या दि. २८-०९-२०१५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर ग्रामपंचायत तसेच कृषी विभागामार्फत फळबाग लागवड कार्यक्रम घेण्यास संदर्भ क्र. १ व २ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. फळबाग लागवड कार्यक्रमांतर्गत वेगवेगळी फळपिके घेण्यात येतात.

सदर प्रकरणी मा. मंत्री कृषी यांचे अध्यक्षतेखाली कृषी विभागाच्या आढावा सभेमध्ये मा. मंत्री महोदयांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत १ लाख हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्याच्या सूचना दिल्या. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फळपिकाच्या लागवडीसाठी, लागवडीमधील वेगवेगळया अंतराचा समावेश केलेला आहे. त्यांचा विचार करुन राज्यातील हवामान आणि जमिनीच्या मगदुराप्रमाणे एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत समावेश असलेल्या वेगवेगळया अंतरावरील फळपिकाची लागवड महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेमध्ये करण्याबाबत चर्चा झाली. त्यावर कृषी विद्यापिठाच्या शिफारसीनुसार ही लागवड करणे योग्य राहील असे ठरले. याबाबत राज्यातील सर्व कृषी विद्यापिठाच्या संशोधन संचालक व उद्यान विद्याप्रमुख यांची बैठक दि. २८/०९/२०१५ रोजी संचालक फलोत्पादन यांचे अध्यक्षतेखाली झाली. कृषी विद्यापीठानी महाराष्ट्रातील हवामान व जमिनीच्या मगदुराप्रमाणे

राज्यात आंबा, संत्रा, बोर, डाळिंब व आवळा या फळपिकांची वेगवेगळया अंतरावरील लागवडी करिता शिफारस केलेली आहे. सद्य:स्थितीत या फळपिकांच्या लागवडीमध्ये असलेले अंतर विचारात घेतले असता सदर अंतरामुळे २ झाडांमधील जास्तीची जागा अनेक वर्षे विनावापर पडून राहते. लागवडी नंतर सुरुवातीच्या ५ ते ७ वर्षाच्या कालावधीत या जागेचा पुर्णपणे वापर होत नाही, तसेच झाडांची संख्या कमी असल्याने हेक्टरी उत्पादन देखील कमी होते. त्यामुळे शेतकऱ्यास आर्थिक फायदा त्याप्रमाणात होत नाही. कृषी विद्यापिठांनी शिफारस केल्यानुसार कमी अंतरावर लागवड केल्यास झाडांच्या संख्येत वाढ तसेच हेक्टरी उत्पादनात वाढ होऊन लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. कृषी विद्यापिठाकडून फळपिकनिहाय आलेल्या वेगवेगळ्या अंतरावरील शिफारसींचा विचार करुन व सध्या प्रचलित रासायनिक खते, किटकनाशके, शेणखत व कलमा रोपांचे सुधारित दर गृहित धरुन आर्थिक मापदंड तयार करण्यात आले आहेत.

आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांचे लागवडीमधील अंतर व कलमे / रोपांचे लागवडीचे सुधारित मापदंड निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत राज्यात फळबाग लागवडीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविण्याचे प्रस्तावित असल्याने शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांमधील अंतरास तसेच कलमे / रोपांचे लागवडीचे प्रती हेक्टरी आर्थिक सुधारित मापदंडास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा या फळपिकांची वेगवेगळया अंतरावरील लागवड व त्यानुसार निर्धारित करण्यात आलेले आर्थिक मापदंड खालीलप्रमाणे राहतील-:

**१. आंबा** :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत आंबा फळपिकासाठी १०x१० मी. अंतरावरील लागवडीस राज्यामध्ये मान्यता आहे. परंतु, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत १०x१० मी, ५x५ मी, ४x६ मी, ३x४ मी, ३x६ मी व २.५x२.५ मी. अंतरावरील लागवडीची शिफारस केली आहे. यापैकी राज्यातील विद्यापीठानी शिफारस केल्यानुसार आंबा फळपिकाकरिता १०x१० मी. व ५x५ मी. अंतरावरील लागवडीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**२. बोर** :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनांमध्ये बोर या रोपासाठी ७x७ मी. व ५x५ मी. अंतरावरील लागवडीस अनुदान देण्यात येते. परंतु, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ६x६ मी, ५x५ मी व ४x४ मी. अंतरावर लागवडीसाठी शिफारस केलेली आहे. यापैकी राज्यातील महात्मा

फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी शिफारस केल्यानुसार ६x६ मी. अंतरावरील बोर फळपिक लागवडीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**३. <u>आवळा</u> :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनांमध्ये राज्यांमध्ये ७x७ मी. अंतरावरील आवळा फळपिक लागवडीस अनुदान देण्यात येते. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ६x६ मी., ४x५ मी. व ३x३ मी. अंतरानुसार अनुदान देण्यात येते. कृषी विद्यापीठानी केलेल्या शिफारशीनुसार आवळा रोपासाठी भारी जमिनीत ८ x८ मी., मध्यम जमिनीत ७x७ मी., व हलक्या जमिनीत ६x६ मी. अंतरावरील लागवडीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**४. <u>डाळिंब</u> :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनांमध्ये डाळिंब कलमाच्या लागवडीसाठी ५x५ मी. अंतरावरील लागवडीस अनुदान देण्यांत येते. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ५x५ मी, ५x४ मी, ५x३ मी, ५x२.५ मी, ४.५x३ मी व ४x३ मी. अंतरावरील लागवडीस अनुदान देण्यांत येते. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी शिफारस केल्यानुसार राज्यात डाळिंब कलमासाठी ५x५ मी, ४.५x३ मी. अंतरावरील लागवडीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

**५. संत्रा :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना या योजनांमध्ये ६x६ मी. अंतरावरील संत्रा लागवडीला अनुदान देण्यांत येते. एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ६x६ मी, ५.४x५.४ मी, ५x५ मी, ५x४.५ मी, ४.५x४.५ मी व ४x५ मी. अंतरावरील लागवडीस अनुदान देण्यांत येते. राज्यांतील कृषी विद्यापीठांनी केलेल्या शिफारशीनुसार संत्रा लागवडीच्या ६x३ मी. व ५.४x५.४ मी. अंतरावरील लागवडीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. त्याचप्रमाणे कृषी विद्यापीठाकडून फळपिकनिहाय आलेल्या वेगवेगळया अंतरावरील शिफारशींचा विचार करुन व सध्या प्रचलित रासायनिक खते, किटकनाशके, शेणखत व कलमा रोपांचे सुधारित दर गृहीत धरुन, सोबत जोडलेल्या प्रपत्र १ ते ८ नुसार आंबा, बोर, आवळा, डाळिंब व संत्रा फळपिकाच्या लागवडीच्या प्रती हेक्टरी सुधारित मापदंडास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर मापदंड तयार करताना मजूरी दर रु. १८१ प्रति दिन गृहीत धरण्यात आलेला आहे. तथापि, राज्यात दि. १/०४/२०१६ पासून मजुरीचा दर रु. १९२/ प्रति दिन निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामुळे रु. १९२ या दरानुसार आर्थिक मापदंड संचालक फलोत्पादन यांनी निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मग्रारोहयो अंतर्गत केंद्र शासन उपरोक्त मजूरीचे दर सुधारीत करील. त्यावेळी सुधारीत मजूरी दरानुसार अंदाजपत्रके सुधारीत करावीत. मात्र राज्य शासनाचे आदेश असल्याशिवाय कोणत्याही परिस्थितीत

सामग्रीच्या दरात वाढ करु नये. तसेच ज्या कालावधीपासून मजूरी दर लागू केला असेल तोच कालावधी विचारात घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

३/५/२०१६

**(डॉ. पुरुषोत्तम भापकर)**
**सचिव (रोहयो)**

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
३. मा मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
५. प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
६. प्रधान सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. आयुक्त, (कृषी) महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)
१०. संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
१२. सर्व विशेष कार्यकारी अधिकारी व उप विकास आयुक्त (रोहयो)
१३. सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो)
१४. मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिक स्तर), पुणे
१५. सर्व विभागीय कृषी सहसंचालक
१६. सर्व उपसचिव/ अपर सचिव/कक्ष अधिकारी, (मग्रारोहयो) नियोजन विभाग, मंत्रालय.
१७. निवड नस्ती, कार्यासन रोहयो-५, नियोजन विभाग, मंत्रालय.

## परिशिष्ट २

### महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना अंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या शेतावर वन फळझाड लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी खर्चाची प्रमाणके

मजूरी दर रु. १९२/- व कलमा रोपांच्या सुधारीत दरानुसार

| अ.क्र | बाब | अंतर (मी) | हेक्टरी झाडे | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | | ९ | १० | ११ | | १३ | १४ | १५ | | १७ | १८ | १९ | |
| १ | आंबा कलमे | ५ X ५ | ४०० | ६६९७० | ५१४०७ | ११८३७७ | ३८० | १९७२९ | १००१४ | २९७४३ | १०९ | ११००५ | १४०२१ | २५०२६ | १०५ | १०५७०४ | ७५४४२ | १८११४६ | ५९४ |
| २ | डाळींब कलमे | ४.५ X ३ | ७४० | ७८१४४ | ४५८६९ | १२४०१३ | ४०७ | २५३४० | २२८२८ | ४८१६८ | १४० | २४४३५ | २०४०८ | ४४८४३ | १३५ | १२७९१९ | ८९२०५ | २१७१२४ | ६८२ |
| ३ | संत्रा कलमे | ६ X ३ | ५५५ | ६३८९३ | ४०६३८ | १०४५३१ | ३५३ | २२२६३ | ७७२६ | २९९८९ | १२३ | २०८१५ | ८०१४ | २८८२९ | ११५ | १०६९७१ | ५६३७८ | १६३३४९ | ५९१ |
| ४ | संत्रा कलमे | ५.४ X ५.४ | ३४२ | ५३७५७ | २५३२४ | ७९०८१ | २९७ | १८४६२ | ४२३० | १८५६० | १०२ | १८१०० | ५०१२ | २३११२ | १०० | ९०३९९ | ३४५६६ | १२०७५३ | ४९९ |
| ५ | आवळा कलमे | ६ X ६ | २७७ | ४४३४५ | १९२४५ | ६३५९० | २४५ | १४८४२ | ४०८० | १८९२२ | ८२ | १४४८० | ४५५० | १९०३० | ८० | ७३६६७ | २७८७५ | १०१५४२ | ४०७ |
| ६ | आवळा कलमे | ८ X ८ | १५० | ३३१२३ | १४१५० | ४७२७३ | १८३ | १०३१७ | २३२५ | १२६४२ | ५७ | ९९५५ | २६०० | १२५५५ | ५५ | ५३३९५ | १९०७५ | ७२४७० | २९५ |
| ७ | बोर रोपे | ६ X ६ | २७७ | ४५२९० | १४४८७ | ५९७७७ | २५० | १४८४२ | ७३११ | २२०५० | ८२ | १३२१३ | ४९५२ | १८१६५ | ७३ | ७३३०५ | २६७५० | ९९९२२ | ४०५ |

संचालक, फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - आंबा कलमे

कलमे संख्या प्रती हेकटरी ४०० (अंतर ५ X ५ मीटर)

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकुण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडीपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ७२४० | २०० | ७४४० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | २०० | ७४४० | ४० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १ X १ X १ मी एकुण खड्डे ४०० | १४४८० | ० | १४४८० | ८० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १४४८० | ० | १४४८० | ८० |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे शेणखत ६ टन, रासायनिक खत सु पर फॉस्फेट ८०० किग्रॅ, किटकनाशकाची भुकटी ४० किग्रॅ म (फोरेट) | ७२४० | २५४०० | ३२६४० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | २५४०० | ३२६४० | ४० |
| २ | कलमे लागवड करणे , किंमत ५० प्रती रोप संख्या ४०० | ७२४० | २०००० | २७२४० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | २०००० | २७२४० | ४० |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ७२४ | ६०० | १३२४ | ४ | ० | ० | ० | ० | ७२४ | ६०० | १३२४ | ४ |
| ४ | खते देणे | ३६२० | ४६०७ | ८२२७ | २० | ३६२० | ९२१४ | १२८३४ | २० | ३६२० | १३८२१ | १७४४१ | २० | १०८६० | २७६४२ | ३८५०२ | ६० |
| ५ | आंतर मशागत करणे | ४५२५ | ० | ४५२५ | २५ | ४५२५ | ० | ४५२५ | २५ | ४५२५ | ० | ४५२५ | २५ | १३५७५ | ० | १३५७५ | ७५ |
| ६ | पीक संरक्षण | २७१५ | १०० | २८१५ | १५ | २७१५ | १०० | २८१५ | १५ | २७१५ | १०० | २८१५ | १५ | ८१४५ | ३०० | ८४४५ | ४५ |
| ७ | पाणी देणे | ७२४० | १०० | ७३४० | ४० | ७२४० | १०० | ७३४० | ४० | ७२४० | १०० | ७३४० | ४० | २१७२० | ३०० | २२०२० | १२० |
| ८ | इतर संकिर्ण | १८१० | ० | १८१० | १० | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | ३६२० | ० | ३६२० | २० |
| | एकुण | ६६९७० | ५१४०७ | ११८३७७ | ३७० | १९७२९ | १००१४ | २९७४३ | १०९ | १९००५ | १४०२१ | ३३०२६ | १०५ | १०५७०४ | ७५४४२ | १८११४६ | ५८४ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादींचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. ३ प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश रु ८४३ प्रति ५० किलो किटकनाशक - फोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक , फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे ५

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळबाग लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - डाळींब कलमे

कलमे संख्या प्रती हेक्टरी ७४० (अंतर ४.५ X ३ मीटर)

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकुण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडीपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ७६८० | ० | ७६८० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७६८० | ० | ७६८० | ४० |
| २ | खड्डे खोदणे,आकार ०.६० X ०.६० X ०.६० मी एकुण खड्डे ७४० | १७६६४ | ० | १७६६४ | ९२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १७६६४ | ० | १७६६४ | ९२ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | ११५२० | ६०० | १२१२० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ११५२० | ६०० | १२१२० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | | | | | | | | | | | | |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे , शेणखत २.७७ टन, रासायनिक खत सुपर फॉस्फेट ३७० किग्रॅ, किटकनाशकाची भुकटी १८.५ किग्रॅ म ( फोरेट) | ६७२० | १२५६५ | १९२८५ | ३५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६७२० | १२५६५ | १९२८५ | ३५ |
| २ | कलमे लागवड करणे, किं मत ३० प्रती रोप संख्या ७४० | ६७२० | २२२०० | २८९२० | ३५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ६७२० | २२२०० | २८९२० | ३५ |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ९०५ | २२२० | ३१२५ | ५ | ० | ० | ० | ० | ९०५ | २२२० | ३१२५ | ५ |
| ४ | खते देणे | ५७६० | १०१०४ | १५८६४ | ३० | ५४३० | २०२०८ | २५६३८ | ३० | ५४३० | २०२०८ | २५६३८ | ३० | १६६२० | ५०५२० | ६७१४० | ९० |
| ५ | आंतर मशागत करणे | १०५६० | १०० | १०६६० | ५५ | ९९५५ | १०० | १००५५ | ५५ | ९९५५ | ० | ९९५५ | ५५ | ३०४७० | २०० | ३०६७० | १६५ |
| ६ | पीक संरक्षण | १९२० | २०० | २१२० | १० | १८१० | २०० | २०१० | १० | १८१० | २०० | २०१० | १० | ५५४० | ६०० | ६१४० | ३० |
| ७ | पाणी देणे | ७६८० | १०० | ७७८० | ४० | ५४३० | १०० | ५५३० | ३० | ५४३० | १०० | ५५३० | ३० | १८५४० | ३०० | १८८४० | १०० |
| ८ | इतर संकिर्ण | १९२० | ० | १९२० | १० | १८१० | ० | १८१० | १० | १८१० | ० | १८१० | १० | ५५४० | ० | ५५४० | ३० |
| | एकुण | ७८९४४ | ४५८६९ | १२४०१३ | ४०७ | २५३४० | २२८२८ | ४८१६८ | १४० | २४४३५ | २०५०८ | ४४९४३ | १३५ | १२७९१९ | ८९२०५ | २१७१२४ | ६८२ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादीचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. [illegible] प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश रु ८४३ प्रति ५० किलो किटकनाशक - फोरेट रु. [illegible] प्रति [illegible]

संचालक , फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे ५

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग फळझाड लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - संत्रा

कलमे संख्या प्रती हेक्टरी ५५५ ( अंतर ६ X ३ मीटर )

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडीपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ५४३० | २०० | ५६३० | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५४३० | २०० | ५६३० | ३० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १X१X१मी एकूण खड्डे ५५५ | १२३०८ | ० | १२३०८ | ६८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १२३०८ | ० | १२३०८ | ६८ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे, शेणखत ३.० टन, रासायनिक खत सुपर फॉस्पेट ४०० किग्रॅ, किटकनाशकाची भुकटी २० किग्रॅ म(फोरेट ) | ७२४० | १३६०० | २०८४० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | १३६०० | २०८४० | ४० |
| २ | कलमे लागवड करणे , किंमत ४० प्रती रोप संख्या ५५५ | ७२४० | २२२०० | २९४४० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | २२२०० | २९४४० | ४० |
| ४ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | १४४८ | २२०० | ३६४८ | ८ | ० | ० | ० | ० | १४४८ | २२०० | ३६४८ | ८ |
| ५ | खते देणे | ७२४० | २४८८ | ९७२८ | ४० | ७२४० | ४९७६ | १२२१६ | ४० | ७२४० | ७४६४ | १४७०४ | ४० | २१७२० | १४९२८ | ३६६४८ | १२० |
| ६ | आंतर मशागत करणे | ३६२० | ६०० | ४२२० | २० | ३६२० | ० | ३६२० | २० | ३६२० | ० | ३६२० | २० | १०८६० | ६०० | ११४६० | ६० |
| ७ | पीक संरक्षण | १८१० | १५० | १९६० | १० | १८१० | १५० | १९६० | १० | १८१० | १५० | १९६० | १० | ५४३० | ४५० | ५८८० | ३० |
| ८ | पाणी देणे | ७२४० | ४०० | ७६४० | ४० | ७२४० | ४०० | ७६४० | ४० | ७२४० | ४०० | ७६४० | ४० | २१७२० | १२०० | २२९२० | १२० |
| ९ | इतर संकिर्ण | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | २७१५ | ० | २७१५ | १५ |
| | एकूण | ६३८९३ | ४०६३८ | १०४५३१ | ३५३ | २२२६३ | ७७२६ | २९९८९ | १२३ | २०८१५ | ८०१४ | २८८२९ | ११५ | १०६९७१ | ५६३७८ | १६३३४९ | ५९१ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादींचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. [illegible] प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो पिशवी, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, किटकनाशक - फोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक, फलोत्पादन

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग फळझाड लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - संत्रा

कलमे संख्या प्रती हेक्टरी ३४२ ( अंतर ५.४ X ५.४ मीटर )

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडीपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ४४३० | २०० | ४६३० | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४४३० | २०० | ४६३० | ३० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १X१X१मी एकूण खड्डे ३४२ | ७६०२ | ० | ७६०२ | ४२ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७६०२ | ० | ७६०२ | ४२ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे , शेणखत १.७ टन, रासायनिक खत सुपर फॉस्पेट २४६ किग्रँ. किटकनाशकाची मुकटी १२ कि ग्रँ म (फोरेट ) | ४५२५ | ७९४० | १२४६५ | २५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४५२५ | ७९४० | १२४६५ | २५ |
| २ | कलमे लागवड करणे , किं मत ४० प्रती रोप संख्या ३४२ | ७२४० | १३६८० | २०९२० | ४० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७२४० | १३६८० | २०९२० | ४० |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ३६२ | १३६० | १७२२ | २ | ० | ० | ० | ० | ३६२ | १३६० | १७२२ | २ |
| ४ | खते देणे | ७२४० | १५५४ | ८७९४ | ४० | ३१०८ | २५२० | ५६२८ | ४० | ७२४० | ४६६२ | ११९०२ | ४० | १७५८८ | ८७३६ | २६३२४ | १२० |
| ५ | आंतर मशागत करणे | ३६२० | ६०० | ४२२० | २० | ३६२० | ० | ३६२० | २० | ३६२० | ० | ३६२० | २० | १०८६० | ६०० | ११४६० | ६० |
| ६ | पीक संरक्षण | १८१० | १५० | १९६० | १० | १८१० | १५० | १९६० | १० | १८१० | १५० | १९६० | १० | ५४३० | ४५० | ५८८० | ३० |
| ७ | पाणी देणे | ४५२५ | २०० | ४७२५ | २५ | ४५२५ | २०० | ४७२५ | २५ | ४५२५ | २०० | ४७२५ | २५ | १३५७५ | ६०० | १४१७५ | ७५ |
| ८ | इतर संकिर्ण | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | २७१५ | ० | २७१५ | १५ |
| | एकुण | ५३७५७ | २५३२४ | ७९०८१ | २९७ | १८४६२ | ४२३० | १८५६० | १०२ | १८१०० | ५०१२ | २३११२ | १०० | ९०३१९ | ३४५६६ | १२०७५३ | ४९९ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादींचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. ३ प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो. किटकनाशक - फोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक , फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्याच्या शेतावर सलग लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - आवळा कलमे

कलमे संख्या प्रती हेक्टरी २७७ ( अंतर ६ X ६ मीटर) हलक्या जमीनी साठी

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडी पूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ४४३० | २०० | ४६३० | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४४३० | २०० | ४६३० | ३० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १X१X१ मी एकूण खड्डे २७७ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ० | ५०६८ | २८ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे शेणखत १.५ टन, रासायनिक खत सुपर फॉस पेट २०० किग्रॅ, किटकनाशकाची भुकटी १० किग्रॅ भ (फोरेट) | ५०६८ | ६८०० | ११८६८ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ६८०० | ११८६८ | २८ |
| २ | कलमे लागवड करणे , किं मत रु ३५ प्रती कलम संख्या २७७ | ५०६८ | ९६९५ | १४७६३ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ९६९५ | १४७६३ | २८ |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ३६२ | ९८० | १३४२ | २ | ० | ० | ० | ० | ३६२ | ९८० | १३४२ | २ |
| ४ | खते देणे | १८१० | १४५० | ३२६० | १० | ३६२० | २९०० | ६५२० | २० | ३६२० | ४३५० | ७९७० | २० | ९०५० | ८७०० | [illegible] | ५० |
| ५ | आंतर मशागत करणे | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | १५२०४ | ० | १५२०४ | ८४ |
| ६ | पीक संरक्षण | ० | ० | ० | ० | १२६७ | १०० | १३६७ | ७ | १२६७ | १०० | १३६७ | ७ | २५३४ | २०० | २७३४ | १४ |
| ७ | पाणी देणे | ५०६८ | १०० | ५१६८ | २८ | ३६२० | १०० | ३७२० | २० | ३६२० | १०० | ३७२० | २० | १२३०८ | ३०० | १२६०८ | ६८ |
| ८ | इतर संकिर्ण | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | २७१५ | ० | २७१५ | १५ |
| | एकूण | ४४३४५ | ११२४५ | ६३५९० | २४५ | १४८४२ | ४०८० | १८९२२ | ८२ | १४४८० | ४५५० | ११०३० | ८० | ७३६६७ | २७८७५ | १०१५४२ | ४०७ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादीचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. ३ प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश रु ८४३ प्रति ५० किलो किटकनाशक - कोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक , फलोत्पादन
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे ५

## महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव - आवळा कलमे

कलमे संख्या प्रती हेक्टरी १५० ( अंतर ८ X ८ मीटर) भारी जमीनी साठी

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकूण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकूण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडी पूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ५४३० | २०० | ५६३० | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५४३० | २०० | ५६३० | ३० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १X१X१ मी एकूण खड्डे १५० | २७१५ | ० | २७१५ | १५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २७१५ | ० | २७१५ | १५ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे , शेणखत १.५ टन, रासायनिक खत सुपर फॉस पेट २०० किग्रॅ, किटकनाशकाची भुकटी १० किग्रॅम (फॉरेट) | २७१५ | ६८०० | ९५१५ | १५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २७१५ | ६८०० | ९५१५ | १५ |
| २ | कलमे लागवड करणे , किंमत ३५ प्रती रोप संख्या १५० | २७१५ | ५२५० | ७९६५ | १५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २७१५ | ५२५० | ७९६५ | १५ |
| ३ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ३६२ | ५२५ | ८८७ | २ | ० | ० | ० | ० | ३६२ | ५२५ | ८८७ | २ |
| ४ | खते देणे | १८१० | ८०० | २६१० | १० | २७१५ | १६०० | ४३१५ | १५ | २७१५ | २४०० | ५११५ | १५ | ७२४० | ४८०० | १२०४० | ४० |
| ५ | आंतर मशागत करणे | २७१५ | ० | २७१५ | १५ | २७१५ | ० | २७१५ | १५ | २७१५ | ० | २७१५ | १५ | ८१४५ | ० | ८१४५ | ४५ |
| ६ | पीक संरक्षण | ० | ० | ० | ० | १२६७ | १०० | १३६७ | ७ | १२६७ | १०० | १३६७ | ७ | २५३४ | २०० | २७३४ | १४ |
| ७ | पाणी देणे | ३६२० | १०० | ३७२० | २० | २७१५ | १०० | २८१५ | १५ | २७१५ | १०० | २८१५ | १५ | ९०५० | ३०० | ९३५० | ५० |
| ८ | इतर संकिर्ण | ५४३ | ० | ५४३ | ३ | ५४३ | ० | ५४३ | ३ | ५४३ | ० | ५४३ | ३ | १६२९ | ० | १६२९ | ९ |
| | एकूण | ३३१२३ | १४१५० | ४७२७३ | १८३ | १०३१७ | २३२५ | १२६४२ | ५७ | ९९५५ | २६०० | १२५५५ | ५५ | ५३३९५ | १९०७५ | ७२४७० | २९५ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादीचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. ३ प्रति किलो, रासायनिक खत सुपर.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश रु ८४३ प्रति ५० किलो किटकनाशक - फोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक , फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजनेशी निगडीत फळझाड लागवड कार्यक्रम अंतर्गत वैयक्तीक लाभार्थ्यांच्या शेतावर सलग लागवडीसाठी फळपिकनिहाय प्रती हेक्टरी आर्थिक मापदंड

फळपिकाचे नाव -बोर रोपे

संख्या प्रती हेक्टरी २७७ ( अंतर ६ X ६ मीटर)

| अ.क्र | बाब | वर्ष पहीले | | | | वर्ष दुसरे | | | | वर्ष तिसरे | | | | एकुण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन | मजुरी | सामुग्री | एकुण | श्रमीक दिन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| अ) | लागवडीपूर्व कामे | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | जमीन तयार करणे | ५४३० | २०० | ५६३० | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५४३० | २०० | ५६३० | ३० |
| २ | खड्डे खोदणे, आकार १X१X१मी एकुण खड्डे २७७ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ० | ५०६८ | २८ |
| ३ | काटेरी झाडांचे कुंपण | १०८६० | १००० | ११८६० | ६० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १०८६० | १००० | ११८६० | ६० |
| ब) | लागवड व संवर्धन कामे | ० | | | | ० | | | | ० | | | | ० | ० | ० | ० |
| १ | माती व खत मिश्रणाने खड्डे भरणे शेणखत १.५ टन, रासायनिक खत सुपर फॉस्फेट २०० किग्रॅ,किटकनाशका ची भुकटी १० किग्रॅ ( फोरेट) | ५०६८ | ६८०० | ११८६८ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ६८०० | ११८६८ | २८ |
| २ | कलमे लागवड करणे , किंमत १५ प्रती रोप संख्या २७७ | ५०६८ | ४१५५ | ९२२३ | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५०६८ | ४१५५ | ९२२३ | २८ |
| ३ | झाडांचे रुपांतर करणे . सामुग्री किंमत संख्या २७७ रु. ७ प्रती काडी | ० | ० | ० | ० | ११३४ | १९३९ | ३०७३ | ७ | ० | ० | ० | ० | ११३४ | १९३९ | ३०७३ | ७ |
| ४ | नांग्या भरणे | ० | ० | ० | ० | ३६२ | ४२० | ७८२ | २ | ० | ० | ० | ० | ३६२ | ४२० | ७८२ | २ |
| ५ | खते देणे | १८१० | २१८२ | ३९९२ | १० | २७१५ | ४७५२ | ७४६७ | १५ | २७१५ | ४७५२ | ७४६७ | १५ | ७२४० | ११६८६ | १८९२६ | ४० |
| ६ | आंतर मशागत करणे | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | ५०६८ | ० | ५०६८ | २८ | १५२०४ | ० | १५२०४ | ८४ |
| ७ | पीक संरक्षण | ९०५ | ५० | ९५५ | ५ | ९०५ | १०० | १००५ | ५ | ९०५ | १०० | १००५ | ५ | २७१५ | २५० | २९६५ | १५ |
| ८ | पाणी देणे | ५०६८ | १०० | ५१६८ | २८ | ३६२० | १०० | ३७२० | २० | ३६२० | १०० | ३७२० | २० | १२३०८ | ३०० | १२६०८ | ६८ |
| ९ | इतर संकिर्ण | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | ९०५ | ० | ९०५ | ५ | २७१५ | ० | २७१५ | १५ |
| | एकुण | ४५२५० | १४४८७ | ५९७३७ | २५० | १४८४२ | ७३११ | २२०२० | ८२ | १३२१३ | ४९५२ | १८१६५ | ७३ | ७३३०५ | २६७५० | ९९९२२ | ४०५ |

टिप - शेणखत, रासायनिक खते, किटकनाशके इत्यादींचे दर सध्याच्या प्रचलित दरानुसार धरलेले आहेत. शेणखत रु. ३ प्रति किलो, रासायनिक खत एस.एस.पी - रु. ४०० प्रति ५० किलो किलो, युरिया रु. २८४ प्रति ५० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश रु ८४३ प्रति ५० किलो किटकनाशक - फोरेट रु. ७० प्रति किलो

संचालक , फलोत्पादन

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ५